**ठळक बातम्या**

- संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेनं भारताची वाटचाल वेगानं होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं प्रतिपादन

- मुंबईत वरळी वांद्रे सी लिंक ला मरीन ड्राईव्ह कडून येणारा रस्ता जोडणाऱ्या किनारी मार्ग प्रकल्पातल्या टप्प्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत ७०  हजार कोटींहून अधिक खर्चाचे रस्ते बांधायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- रायगड जिल्ह्यात धाटाव इथं रासायनिक कंपनीमध्ये झालेल्या स्फोटात ३ कामगारांचा मृत्यू

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेनं भारताची वाटचाल वेगानं होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. भारतीय हवाई दलातर्फे राजस्थानात जोधपूर इथं आयोजित तरंग शक्ती विमान सरावाची पाहणी केल्यानंतर आज ते बोलत होते. या सरावाच्या निमित्तानं हवाई दलानं आयोजित केलेल्या भारतीय संरक्षण हवाई प्रदर्शन म्हणजे आयडॅक्स-२४ चं उद्घाटन  संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या हस्ते झालं. आजपासून चौदा तारखेपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात विमानविषयक सामुग्री उत्पादन

क्षेत्रातल्या कंपन्यांचा मोठा सहभाग आहे. अनेक उत्पादनं आणि तंत्रज्ञानांची चुणूक त्यात बघायला मिळणार आहे. यंदाच्या तरंग शक्ती सरावाचा हा दुसरा अंक असून त्यात १० देश सहभागी झाले आहेत, तर १८ देश निरीक्षक म्हणून उपस्थित आहेत.  तरंगशक्तीमध्ये भारत आणि मित्र देशांच्या हवाई सामर्थ्याची आणि नवनवीन आविष्कारांची चुणूक नागरिकांना बघायला मिळणार आहे.

**<><><><>**

‘मुंबई महानगर क्षेत्रः  जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकास’ या निती आयोगाच्या अहवालाचं आज मुंबईत प्रकाशन होणार आहे. यावेळी MMRDA अर्थात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकारण आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्यात सामंजस्य करार करण्यात येणार आहे. मुंबईतल्या सह्याद्री अतिथीगृहात दुपारी साडेतीन वाजता हा कार्यक्रम होईल. यात वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष क्लॉस श्वाब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

मुंबईत वरळी वांद्रे सी लिंक ला मरीन ड्राईव्ह कडून येणारा रस्ता जोडणाऱ्या किनारी मार्ग प्रकल्पातल्या टप्प्याचं लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच मंत्री दीपक केसरकर आणि मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. या सागरी किनारा मार्गामुळे मरीन ड्राईव्ह ते वांद्रे हा पाऊण तासाचा रस्ता केवळ १० मिनिटात पार करता

येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. आपल्या सरकारने राजधानी मुंबईला नेहमीच प्राधान्य दिलं असून मुंबईकरांना खड्डेमुक्त रस्ते आणि इतर सुविधा देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. किनारी मार्गाच्या बांधकामाचा अडथळा मच्छिमारीत येऊ नये याकरता रचनेत बदल केला असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात कोपरी इथल्या शासकीय तांत्रिक विद्यालयात उभारलेल्या संविधान मंदिराचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि  नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय तसंच राज्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीनं हे मंदिर उभारण्यात आलं आहे. येत्या रविवारी १५ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता दूरदृश्यप्रणालीद्वारे उपराष्ट्रपती या संविधान मंदिराचं लोकार्पण करणार आहेत.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या संविधान संपवणार या वक्तव्याविरोधात भाजपाच्या अनुसूचित जाती मोर्चाने आज नागपूरच्या संविधान चौकात आंदोलन केलं. यावेळी राहुल गांधी यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले.

**<><><><><>**

पाच दिवसांच्या गणपतींना काल निरोप देण्यात आला. **मुंबईत** काल सुमारे ३७ हजार घरगुती आणि १ हजार सार्वजनिक गणपतींचं विसर्जन झालं. बृहन्मुंबई महानगर पालिकेनं त्यासाठी कृत्रिम तलावांची सुविधा उपलब्ध करून दिली होती. राजभवन इथल्या गणपतीचं विसर्जनही राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या सूचनेनुसार, आवारातल्या कृत्रिम हौदात करण्यात आलं. राज भवनात स्थापन केलेली शाडूची मूर्ती नाशिक मध्यवर्ती कारागृहातल्या एका कैद्यानं बनवली होती. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी विविध देशांचे राजदूत आणि परराष्ट्र व्यवहार अधिकाऱ्यांच्या विशेष उपस्थितीत काल श्री गणेशाची आरती झाली. या परदेशी पाहुण्यांना उकडीच्या मोदकांसह खास पारंपारिक मराठमोळी मेजवानी देण्यात आली.
आज गौरींचं विसर्जन होणार आहे. काल घरोघरी या माहेरवाशिणींची पूजा करून गोडाधोडाचं जेवण देण्यात आलं. आजच्या विसर्जनासाठी मुंबईतल्या वाहतुकीचं नियमन करण्यात आलं असून पोलिसांनीही चोख बंदोबस्त ठेवला आहे.

**<><><><><>**

गणेशोत्सवासाठी रत्नागिरी जिल्ह्यात आलेल्या चाकरमान्यांच्या परतीच्या प्रवासासाठी राज्य परिवहन महामंडळानं आजपासून अडीच हजार बस गाड्यांच्या फेऱ्यांचं नियोजन केलं आहे. आजच्या गौरी-गणपती विसर्जनानंतर परतीच्या प्रवाशांमध्ये वाढ होईल, हे गृहीत धरून आजपासून येत्या २० तारखे दरम्यान मुंबई, ठाणे, पुणे आदी ठिकाणी जाणाऱ्या अतिरिक्त बसफेऱ्यांचं

नियोजन करण्यात आलं आहे.

**<><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत, आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये. आज आपण जाणून घेणार आहोत, ऑस्ट्रिलियातल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं २०२४-२५ ते २०२८-२९ या आर्थिक वर्षांसाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची अंमलबजावणी करण्याचा ग्रामविकास खात्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. या योजनेचा एकंदर खर्च ७० हजार १२४ कोटी रुपये इतका असणार आहे. केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. दळणवळणाच्या कक्षेत नसलेल्या सुमारे २५ हजार पात्र गावांना जोडण्यासाठी ६२ हजार ५०० किलोमीटरचे रस्ते बांधण्यासाठी आर्थिक साह्य दिलं जाणार आहे. या योजनेमुळे चाळीस हजार मानवी दिवस इतक्या रोजगाराची निर्मिती होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

सत्तर वर्षांवरच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा आयुष्मान भारत पीएम जनआरोग्य योजनेत समावेश करायलाही मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा नसेल. सर्व पात्र ज्येष्ठ नागरिकांना प्रति कुटुंब पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाचे उपचार अन्य

योजनांच्या लाभाखेरीज अतिरिक्त मिळणार आहेत. हवामान बदलांशी जुळवून घेण्याच्या दृष्टीनं तयार करण्यात आलेल्या मिशन मौसमलाही सरकारनं मंजुरी दिली असून त्याकरता येत्या दोन वर्षांमध्ये दोन हजार कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयातर्फे राबवल्या जाणाऱ्या या मिशन मौसममध्ये हवामान आणि वातावरणविषयक संशोधन आणि सेवांना आधार दिला जाणार आहे. २०२४-२५ ते २०२८-२९ या आर्थिक वर्षांमध्ये ३८ हजारापेक्षा जास्त ई-बसच्या खरेदीसाठी आर्थिक निधी देण्याचा निर्णयही काल मंत्रिमंडळानं घेतला. या निधीतून बसच्या खरेदीनंतर बारा वर्षांपर्यंत त्यांच्या देखभालीसाठीही व्यवस्था करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

राज्यातली प्रमुख धरणं सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातच ९० ते ९५ टक्के भरली आहेत. मराठवाड्यात जायकवाडी धरण ९८ टक्के, सोलापुरात उजनी धरण १०० टक्के आणि साताऱ्यातलं कोयना धरण ९९ टक्के भरलं आहे. पुणे आणि कोकणातली ९७ टक्के धरणं पूर्ण भरली असून, मुंबई तसंच ठाणे जिल्ह्यातली धरणंही ९५ ते १०० टक्के नागपूर विभागातली धरणं ८५ टक्के भरली आहेत. अमरावतीतील ऊर्ध्व वर्धा धरण ९५ टक्के तर यवतमाळमधील इसापूर धरण ९८ टक्के भरलं आहे. गोसीखुर्द धरण केवळ ५५ टक्के उत्तर महाराष्ट्रातलं जळगावमधलं उर्ध्व तापी धरण ४५ टक्के भरलं आहे.

ऑक्टोबरपर्यंत उर्वरित धरणंही भरतील, असा अंदाज आहे. यामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामात जास्त उत्पादनाची अपेक्षा आहे.

<><><><>

रायगड जिल्ह्यात धाटाव एमआयडीसीमध्ये असलेल्या एका रासायनिक कंपनीमध्ये आज सकाळी साडेअकराच्या सुमारास झालेल्या स्फोटात 3 कामगारांचा मृत्यू झाला. स्फोट इतका शक्तिशाली होता की या परिसरात जवळपास एक किलोमीटरपर्यंत त्याचा आवाज पोहा◌ेचला. यामुळे भीतीचं वातावरण तयार झालं. घटनास्थळी अग्निशामक दलाकडून बचावकार्य सुरू आहे.

<><><><>

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात काल ढग फुटी सदृश पाऊस झाल्यामुळे नदी, नाले ओसंडून वाहू लागले आणि अनेक गावांचा संपर्क तुटला. वैनगंगा नदीने धोका पातळी ओलांडली आहे. त्यामुळे गोसीखुर्द धरणाचे २७ दरवाजे  दीड मीटरने तर ६ दरवाजे एक मीटरने उघडण्यात आली आहेत. दरम्यान वैनगंगा नदीवर पुलाच्या बांधकामात वापरण्यात येणारी क्रेन पुराच्या प्रवाहात वाहून गेली असून या क्रेनला आठ किलोमिटर अंतरावर पाण्याबाहेर काढण्यात यश आलं आहे.

<><><><>

विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांसह तसंच मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र हलका ते मध्यम पाऊस पडेल.

**//<><><><><>//**